अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

# आता महिनाभर खोटे बोलण्याचा महोत्सव

राजकारणाची धुमशान सुरू झाली आहे. प्रचाराचा रंग हळू हळू वाढू लागेल. येणारा एक दीड–महिना म्हणजे सगळ्या राजकीय पक्षांमध्ये सर्वाधिक खोटे कोण बोलतो अशी स्पर्धा पहायला मिळेल. ज्याप्रमाणे दर तीन वर्षांनी अधिक महिना येतो तसा राजकारणात दर पाच वर्षांनी हा एक खोटा महिना येतो. या काळात राजकारणी नेत्यांना आपण काय बोलत आहोत याचे फारसे भान नसते. येनकेन प्रकारेन आपण निवडून त्यासाठी वाटेल ती आश्वासने देण्यासाठी ते नव्याने विषय शोधून काढतात.सगळ्या राजकारणाचा व्यापार आणि बाजार झाल्याने जो तो आपल्या पक्षाची दुकानदारी कधी चालेल असा प्रयत्न करतो. आता तर जमाना बदलला आहे. मॉडर्न टेक्नोलॉजी रॉक म्युझिक पब शॉपिंग मॉलचा जमाना आला आहे. राजकीय पक्षांचीही कार्यालये सुध्दा एखाद्या मॉलसारखी झाली आहेत. आपला माल खपवण्यासाठी जसे मॉल्समध्ये एकावर एक फ्री दिले जाते. तसाच एकावर एक फ्री देण्याची चढाओढ राजकीय पक्षात आहे म्हणजे काय? तर आपापल्या जाहिरनाम्यात अनेक गोष्टी फुकट देण्याची आमिषे दाखवली जातात. एका मतावर एक लॅपटॉप फ्री किंवा मताच्या मोबदल्यात पाच किलो तांदूळ फ्री अशी आश्वासनांची खैरात केली जाते. आपल्या मतांचा गल्ला भरला पाहिजे एवढाच त्यांचा उद्देश राहिला आहे.आपण निवडून यावे यासाठी सर्व प्रकारचे मार्केटिंग केले जाते. कोणी फेरीवाल्यांप्रमाणे रोड शो करतात तर कोणी चहाचा स्टॉल हाच चर्चे साठी निवडतात. इंटरनेट मोबाईल ट्विटर किंवा व्हर्नेग या सर्वांचा वापर करून आपला माल कसा तुम्हाला परवडणारा आहे, हे पटवून देण्याचा प्रयत्न होईल. ज्याप्रमाणे व्यापारात कधीही किंवा नेहमी खरे बोलता येत नाही तसे राजकरणाचे झाले आहे. जगातल्या अनेक तत्त्ववेत्त्यांनी राजकारणाचे भाष्य करताना फारसे चांगले शब्दप्रयोग वापरलेले नाहीत. राजकारण ही लबाडांची मक्तेदारी असणारी बाजारपेठ आहे असा सर्वांचा सूर दिसून येतो. सर्वात दु:खाची आणि शरमेची गोष्ट अशी की निवडणुकांमध्ये लोकांना लोकशाही व्यवस्था किती पवित्र आहे असे सांगितले जाते तर दुसरीकडे त्याच लोकशाहीत सर्व प्रकारचे असभ्य व्यवहार करायची ही तत्वभ्रष्टता आपल्या देशातल्या राजकारणाने गाठली आहे. दर पाच वर्षांनी निवडणूक आली की राजकीय पक्ष आणि त्यातल्या नेत्यांची जमात आपापले दात दाखवायला सुरुवात करते. म्हणजे खोटेपणा हीच आपल्या राजकारणाची ओळख असल्याचे पदोपदी जाणवते. अगदी निवडणुकीत सभ्य प्रामाणिक माणसाला उमेदवारी न देण्यापासून कोणत्या जातीचे कोणात्या मतदारसंघात किती वर्चस्व आहे हे पाहून तिकीट देण्यापर्यंत खोटेपणा केला जातो. एकीकडे राष्ट्रीय एकात्मतेच्या गप्पा मारायच्या तर दुसरीकडे जातीपातीच्या राजकारणाच्या कुलंगड्या करायच्या इतका भयानक प्रकार आपल्या राजकारणात पहायला मिळतो.

### हौशा गवशांचा हैदोस

प्रत्यक्ष बोलणे आणि व्यवहार यात कमालीची तफावत दिसून येते किंवा सामान्य मतदारापुढे बोलताना सांगायचे एक आणि करायचे दुसरेच. म्हणजेच सामान्य मतदाराला महत्त्व द्यायचे नाही त्यांचा केवळ वापर करून घ्यायचा हा प्रकार गेली अनेक वर्षे आणि अनेक निवडणुकांमधून होत आला आहे. मतदारांना वापरून घेण्याच्या राजकारण्यांच्या बनवेगिरीला आपण किती बळी पडायचे याचा विचार करण्याची वेळ आली आहे. मतदारांनी आपली बुद्धी शाबूत ठेवनूच मतदानाचा निर्णय घेण्याची वेळ येऊन ठेपली आहे. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे निवडणुकांचे निकाल लागेपर्यंत खोटेपणाचा हैदोस आपल्याला पहायला मिळेल. प्रत्येक पक्षाचा उमेदवार आपण किती प्रामाणिक आहोत. आपण किती सत्यनिष्ठ आणि स्वच्छ प्रतिमेचे आहोत. आपल्याला सामान्य माणसाविषयी कशी तळमळ आहे. आपणच खरे जनसेवक, आपणच बावनकशी सोन्यासारखे समाजसेवक आहोत. समाजाची, देशाची काळजी फक्त आपल्यालाच आहे असे स्वत:चे चित्र निर्माण करण्याचा आटोकाट प्रयत्न प्रत्येक राजकीय कार्यकर्ते आणि नेता करतो, ज्यांना नेतृत्व करायचे असते. ज्यांना अगदी पंतप्रधानपदाची महत्त्वाकांक्षा असते त्यांच्या तोंडाला तर काही सीमाच नसते. देशातल्या सगळ्या घटकांचे भले करण्यासाठी अवतीर्ण झालेला एकमेव अवतार म्हणजे आपणच आहोत. तुम्ही मला एकदा पंतप्रधान कराच मी तुम्हाला हा देश अमेरिकेपेक्षाही जास्त प्रगत करून दाखवतो असा खोटेपणाचा फुत्कार ते टाकताना दिसतात.

### जागरूक मतदारांची कसोटी

अगदी काल –परवा समाजकारणात किंवा राजकारणात आलेले नवखेसुद्धा एकदम व्यवस्था परिवर्तनाची भाषा बोलू लागतात. अनेक हौशे–गवशे आपण देशाचे आणि समाजाचे मसीहा आहोत असा अविर्भाव निर्माण करतात त्यांचा हा सगळा प्रयत्न म्हणजेच खोटेपणाच्या सगळ्या सीमा ओलंडणारा ठरतो. जगातल्या सर्वांत मोठ्या लोकशाहीवादी देशात निवडणुकीच्या निमित्ताने असा खोटेपणाचा महोत्सव भरत असेल तर मग तो लोकशाहीचा पराभवच मानायला हवा. लोकशाहीच्या नावाखाली खोटेशाहीचे उदात्तीकरण करण्याची राजकारण्यांना आता इतकी सवय झाली आहे की, त्याशिवाय त्यांना निवडणुकाच लढता येत नाहीत.म्हणूनच प्रश्न असा निर्माण होतो की राजकारण्यांना असे करण्याची गरजच का पडते. ते प्रामाणिकपणे किंवा दिलेला शब्द पाळून निवडणुका लढवू शकत नाही का किंवा त्यांना इतके प्रचंड खोटे बोलण्याची सवय का लागली? ती कोणामुळे लागली हे देखील तितकेच महत्त्वाचे ठरते. खोटे केव्हा बोलले जाते ज्यावेळी एखादी गोष्ट हडप करण्याची वृत्ती वाढते त्यावेळी प्रामाणिकपणा, कष्ट या मार्गाने जाण्याची अशा लोकांची तयारी नसते. कमीत कमी वेळात आणि कमीत कमी कष्टात आपल्याला पाहिजे ते मिळवण्याचा त्यांचा हा अट्टाहास असतो. सत्तेची चटक लागलेले आजचे राजकारणी यासाठीच सत्ता प्राप्त करण्याकरिता या खोटेपणाचा मार्ग स्वीकारतात अशा परिस्थितीत मतदारांनी सावध राहणे आणि या खोटेपणाच्या महोत्सवामध्ये स्वत:चे मूल्य हरवू न देणे महत्त्वाचे ठरते. लोकशाहीचे पावित्र्य आणि समाजातली सभ्यता टिकवायची असेल आणि राजकारण्यांकडून जर अशा खोटेपणाचा आश्रय घेतला जात असेल तर तो उघडा पाडण्याचे कामही केले गेले पाहिजे. निवडणुका आहेत याचा अर्थ वाटेल ते बोललेले चालते आणि लोक ते मान्य करतात. अशी समजूत निर्माण होता कामा नये, ही खबरदारी जागरूक मतदारांनीच घ्यायची आहे.